# 'जागर अस्मितेचा'

स्मरणिका २०१७



३४ वे

# अस्मितादर्श

## साहित्य संमेलन लातूर

३४ वे अस्मितादर्श

## साहित्य संमेलन, लातूर

जानेवारी २०१७

---


● 'जागर अस्मितेचा' स्मरणिका–२०१७

---

● प्रकाशन दि. : १४ जानेवारी २०१७

---

● प्रकाशक :

प्राचार्य डॉ. माधव गादेकर

अध्यक्ष,

३४ वे अस्मितादर्श साहित्य संमेलन

संयोजन समिती, लातूर

---

● मुद्रक :

गुरुकृपा ग्राफिक्स,

लोखंडगल्ली, लातूर. मो–९४२२६३९९४०

---

● अक्षर जुळणी :

गुरुकृपा ग्राफिक्स,

लोखंडगल्ली, लातूर. मो–९४२२६३९९४०

---

● स्वागतमूल्य : ₹ १००/–


---



## भीमा तुझ्या जन्मामुळे

उध्दरली कोटी कुळे,
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।धृ।।

एक ज्ञान ज्योतीने कोट कोट ज्योती
तळपतात तेजाने तुझ्या धरेवरती
उजळे, काळोख मावळे,
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।१।।

जखडबंद पायातील साखळदंड
तटातट तुटले तू ठोकताच दंड
झाले गुलाम मोकळे
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।२।।

कुजे वृक्ष तैसाच होता समाज
हिरवी, हिरवी पाने तयालाच आज
अमृताची आली फळे
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।३।।

धम्म–चक्र फिरले, गेला गेला कलंक
ज्ञानदाता झाला आज रावास रंक
पंकी सुगंध दरवळे
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।४।।

काल कवडीमोल जिणे वामनाचे होते
आज जुळे जगताशी प्रेमाचे नाते
बुद्धाकडे जग हे वळे
भीमा तुझ्या जन्मामुळे ।।५।।

– वामन कर्डक


टीप : 'अस्मितादर्श' स्मरणिका–२०१७ मधील प्रकाशित झालेल्या लेखांमध्ये व्यक्त झालेली मते संबंधित लेखकांची वैयक्तिक असून, त्यास संपादक, प्रकाशक, मुद्रक तथा संयोजन समिती सहमत असतीलच असे नाही.

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

## अंतरंग......

- संपादकीय
- स्वागताध्यक्षीय भाषण
- अध्यक्षीय मनोगत : संयोजन समिती अस्मितादर्श साहित्य संमेलन
- शुभसंदेश : मा. ना. विनोद तावडे

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : व्यासंग आणि विद्वत्ता - डॉ. जनार्दन वाघमारे ........ १७
२) अस्मितादर्श साहित्यसंमेलन : काही आठवणी - योगीराज वाघमारे ........ २७
३) आंबेडकरी चळवळीतील साहित्यिकांची - भूमिका / स्थान जबाबदारी- डॉ. मिलिंद विनायक बागूल ..... ३२
४) आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्य चळवळीची वाटचाल - सुरेश साबळे, बुलडाणा ........ ३५
५) गेल्या दशकातील दलित कथा - डॉ. सारीपुत्र तुपेरे ........ ३९
६) धर्म, संविधान आणि नैतिकता - -डॉ. अनंत राऊत ........ ४५
७) "मराठी दलित साहित्य : काल, आज आणि उद्या-डॉ. परशुराम गिमेकर ........ ५२
८) लातूर जिल्ह्यातील आंबेडकरी जाणिवेची कथा-प्रा.डॉ.जयद्रथ जाधव ........ ५९
९) मराठवाड्यातील आंबेडकरी लेखिकांचा सृजनाविष्कार-डॉ. राजेंद्र गोणारकर ........ ६५
१०) लातूरमधील आंबेडकरी चळवळीचा प्रारंभ आणि रायभोळे मामा-सीताराम हौसाजी धसवाडीकर ........ ६७
११) 'अस्मितादर्श - डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रजत जयंती विशेषांक : २०१६'
- एक आकलन -डॉ. चिंतामण कांबळे ........ ७५
१२) भारतीय दलित साहित्याचा प्रेरणाविचार आणि प्रादेशिक सामाजिक चळवळी
-प्रा. डॉ. कीर्तिकुमार मोरे ........ ८०
१३) तत्त्वचिंतक गंगाधर पानतावणे-प्रा. डॉ. म.ई. तंगावार ........ ८४
१४) लातूर जिल्ह्यातील परिवर्तनवादी चळवळीत दलित साहित्याचे योगदान- डॉ. नारायण तु. कांबळे ........ ९१
१५) भारतीय संविधानाचे स्वरूप-प्रा. वाय. आर. गायकवाड ........ १००
१६) उत्तुंग प्रतिभेची धगधगती मशालः प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे-डी.बी. जगप्पुरिया औरंगाबाद ११०
१७) कन्नड दलित साहित्य आणि नाट्यवाङ्मय-डॉ. चंद्रकांत वाघमारे ........ ११२
१८) आंबेडकरवादी मराठी कथा : दिशा आणि वास्तव-प्रा. डॉ. सा. द. सोनसळे ........ १२३
१९) "लातूर जिल्ह्यातील आत्मकथने" -डॉ. दुष्यंत मनोहर कटारे ........ १२७
२०) आंबेडकरवादी मराठी कथा : दिशा आणि वास्तव-प्रा.डॉ.सा.द.सो-नसळे ........ १३२
२१) लातूर जिल्ह्यातील आंबेडकरी प्रेरणेची कविता-डॉ. लहु दिगंबर वाघमारे ........ १३७
२२) लातूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ : एक दृष्टिक्षेप-प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे ........ १४३
२३) आंबेडकरी चळवळीतील मार्गदर्शकः डॉ. गंगाधर पानतावणे-प्रा.डॉ. मल्हारी धोंडिबा मसलखांब ........ १४५

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Dist. Parbhani
Late Ramesh W... College, Sonpeth

(१८)

# आंबेडकरवादी मराठी कथा : दिशा आणि वास्तव

प्रा. डॉ. सा. द. सोनसळे

■■■

तथागत बुद्ध, संत कबीर, क्रांतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतिदर्शी विचार नव वाङ्मयाच्या तलस्पर्शी घेऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या सामाजिक मूल्यांची साहित्यातून मांडणी करण्यासाठी अनेक साहित्यिकांनी समाजाचे जीवन शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. आज सर्वत्र आंबेडकरवादाच्या बाबतीत चांगली चर्चा होत आहे. आंबेडकरी विचार हा मानवतेला वृद्धिंगत करणारा बलशाली विचार आहे.

या देशातल्या प्रस्थापित व्यवस्थेने माणसाचे शोषण करून त्याला पीडित बनविले. सामाजिक क्रांती इ ल्याशिवाय समाज परिवर्तनाच्या लढ्याला गती येऊ शकत नाही. आंबेडकरवाद हा परिवर्तन आणि प्रवर्तन यांचा एकत्रितपणे विचार होय. हा विचार माणसांना सर्व जाचक बंधनाना लाथाडायला लावतो. जुनाट धर्मव्यवस्था, वर्ण व वर्ग व्यवस्था जातिभेद अशा सर्व प्रकारची विषमता नाकारण्याचे शिकवतो. आधुनिकतेचा वसा घेतलेला, नव्या जीवनाच्या स्वप्नांना मूर्तरूप देणारा हा विचार आहे. या विचाराला पोथिनिष्ठता, आणि पुराणप्रियता अजिबात मान्य नाही. माणसावर योग्य संस्कार करण्यासाठी सातत्याने क्रियाशील असतो. सांस्कृतिकदृष्ट्या कृतिशिल असतो. आंबेडकरी विचारांबद्दल 'आंबेडकरवादी साहित्य; दृष्टिकोण आणि दायित्त्व' या ग्रंथामध्ये हरीश खंडेराव म्हणतात, "जाति विरहित समाजरचना आणि बाद्ध धम्म हा जीवनमार्ग आहे. त्याची हमी देणारा विचार होय आंबेडकरवाद." आंबेडकरनीती संकल्पनेविषयी विस्तृत विवेचन करणारा आहे. नीतिमत्ता हा आंबेडकरवादाचा मूळ गाभा आहे. माणसाला प्रज्ञा, शील, आणि करूणेचा विचार देणारा हा विचार आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार या विचारधारेने केला आहे. लोक हा धर्म निरपेक्षता म्हणजेच आंबेडकरवाद होय. केवळ साहित्याच्या क्षेत्रातच नाही, तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आंबेडकरी विचार मार्गदर्शक आहे. जगाचे वैचारिक नेतृत्त्व आंबेडकरवादच करू शकतो.

सन १९१७ मध्ये डॉ. बाबासाहेबांची मानवमुक्तीसाठी वैचारिक, मौखिक आणि लिखित या सर्व आघाड्यांवर वैचारिक क्रांती सुरू झाली. मूकनायकाने लढ्याला सुरूवात केली, आणि पुढे 'समता', 'जनता' 'बहिष्कृत भारत' , 'प्रबुध्द भारत' या पाक्षिकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वैचारिक भूमिका मांडली. या विचारांचा प्रभाव तत्कालीन विचारवंत राजकीय नेते, समाजसुधारक आणि साहित्यिकांवर पडला. 'मूकनायकातून' , बहिष्कृत भारतातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मव्यवस्थेला आणि समाज व्यवस्थेला प्रश्न विचारले. त्यामुळे भारतीय जनमानस तर ढवळून निघालेच; पण, जातीयवादी, विषमतावादी धर्म व्यवस्थेच्या बुरूजांना प्रचंड हादरे बसू लागले. बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाने दबलेल्या मनाला नवचेतना मिळाली आणि हजारो वर्षांच्या मौनाला वाचा फुटली. हाच आंबेडकरी साहित्याचा आरंभ होय. आंबेडकरी साहित्य ज्या काळात माणसांच्या

दु:खाबद्दल टाहो फोडत होते, त्या काळात मराठीतील मध्यमवर्गीय जाणीव घेऊन साहित्य निर्मिती करत होते. कुत्र्या, मांजरावर नामांकित लेखकांच्या कथा गाजत होत्या. भारतीय स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत शिक्षणाच्या हक्काविषयी केलेली तरतूद महत्त्वाची आहे. बाबासाहेबांचे विविध पातळ्यांवरील लढे यामुळे तळागाळातला माणूस सुज्ञ झाला. ही कथा आंबेडकरी विचारांचा प्रभाव सांगणारी आहे. केवळ गावकुसाबाहेरच्या अस्पृश्यांमध्येच दास्यमुक्तीबद्दल चर्चा होत नव्हती, तर ती गावकुसातील धार्मिक गुलाम असणाऱ्या अस्पृश्यांमध्येही होत होती. भारतीय जनमानसात सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरे घडू लागली होती. बाबासाहेबांच्या विचाराने प्रभावित झालेले अनेक लेखक, कलावंत आपल्या जगण्याचा हक्क असल्याचे सांगू लागली होती. तुकाराम पुरोहित या लेखकाने 'प्रतिज्ञा' नावाची कथा सुधारणावादी आणि सनातनी यांच्या अंत.संघर्षावर १९३३ मध्येच लिहिली.

आंबेडकरी वृत्तपत्राबरोबरच आंबेडकरी प्रेरणेची कथा भरारी घेऊ लागली. बंधु माधवाची कथा ही आंबेडकरी प्रेरणेची पहिली कथा आहे. अस्पृश्यांची सुरूवातीची कथा चळवळीची भूमिका घेणारी आहे तर ती पुढे पुढे अस्पृश्यांना 'माणूस' म्हणून स्वीकारण्यासाठी आव्हान करणारी आहे. त्यातूनच पुढे तिचा प्रवास आक्रमकतेकडे व विद्रोहाकडे होताना दिसतो. 'माणसाचे मूल्य आंबेडकरवादच जाणू शकतो', हा विचार घेऊन या काळात लिहिणारे रमेश शिंदे, भाई नरेंद्र मोरे, यादवराव गांगुर्डे, धनराज उहाट, निर्गुणा कांबळे, होत. या कथाकारांच्या कथामध्ये तीव्र स्वरूपाचा संघर्ष आहे. संघर्षाचे परिणाम भोगण्याची तयारी आहे. संघर्ष आणि विद्रोह ही दोन्ही रूपं या ठिकाणी पाहायला मिळतात. धनराज निकम यांच्या 'गावपंढरी' या कथेत पाटलासोबत महारवाड्यातील नायक संघर्ष करतो. हे त्या काळातले मोठे बंड आहे. आंबेडकरी चळवळीने निर्गुणा कांबळे सारखी पहिली कथा लेखिका दिली. त्यांनी आपल्या कथेत वास्तवता, संघर्ष, देवदासीसारख्या प्रथा आणि आंतरजातीय विवाह यांचे चित्रण केले. हा आंबेडकरी विचारांचा फार मोठा परिणाम आहे. पहिल्या पिढीतील कथाकारांना सामाजिक वास्तवाचे भान जबरदस्त आहे. कारण ते कथा लिहिताना चळवळीचा एक भाग म्हणून लिहीत होते. जीवनवादी दृष्टिकोण या साहित्यिकांनी प्रथम कथेत आणला.

आंबेडकरवादी कथा सुरूवातीच्या काळात वृत्तपत्रातील विशेष पुरवण्या, रविवारच्या पुरवण्या, दिवाळी अंकांमधून आल्या. सन १९५०-६० च्या दशकातील आंबेडकरी कथेचा पाया मजबूत आहे. या काळात अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, सुखराम हिवराळे हे महत्त्वाचे कथाकार लिहीत होते.

सन १९६० ते १९७०च्या दशकात बाबुराव बागूल हे लेखन करत होते. त्यांचा पहिला कथासंग्रह 'जेंव्हा मी जात चोरली होती' प्रकाशित झाला. बाबुराव बागुलांनी आंबेडकरी साहित्याला विद्रोहाचे योगदान दिले. आंबेडकरवाद जगू इच्छिणारा नायक 'जय' च्या रूपाने त्यांनी उभा केला. तो तीव्र सामर्थ्याने नकार देणारा आहे. या काळात हि.गो.बन्सोडे, केशव मेश्राम हे ललित लेखन करत होते तर राजा ढाले, नामदेव ढसाळ, अशोक शहाणे, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत खोत, तुलसी परब हे प्रस्थापित मराठी साहित्यातील उणिवांवर लिहीत होते. या दशकातील कथा 'समूहाची कथा' म्हणून पुढे आली आहे. त्या मानसिक संघर्षाचेही चित्रण करतात. तसेच नवबौद्धांच्या विविध जीवनपैलूंवर भाष्य करणाऱ्या कथा आहेत. या काळात वामन होवाळांच्या कथेतून अंधश्रद्धानिर्मुलनावर चिंतन आले आहे तर अर्जून डांगळे बौद्धांच्या राजकीय अपयशावर लिहिले आहे. योगिराज वाघमारे, अविनाश

डोळस या कथाकारांनी आत्मटीका केल्या आहेत. त्यामुळे आंबेडकरी प्रेरणेची कथा अधिकाधिक अंतर्मुख झाली आहे.

सन १९७० ते १९८०-८५ या कालखंडातील आंबेडकरी कथांमध्ये नवा बदल जाणवतो. आंबेडकरी चळवळीत ही नेतत्त्वाबद्दल तेढ निर्माण झाले होते. दलित पँथरचा उदय त्या दृष्टीने महत्वाचा मानला जात होते. या काळात कथालेखनात आघाडीवर असलेले कथाकार प्रकाश खरात, अविनाश डोळस, योगीराज वाघमारे, योगेंद्र मेश्राम, ई.मो.नारनवरे, के.व्ही.सरवदे, धर्मराज निमसकर, रविचंद्र हडसनकर, अमिताभ, सुधाकर गायकवाड, माधव कोंडविलकर, बाबूराव गायकवाड, भीमसेन देठे, जगदीश कदम या सर्व कथाकारांनी बंडखोरीच्या विद्रोही आणि मानवी मुल्यांचा आग्रह धरणाऱ्या कथा लिहिल्या. बाबासाहेबांचा विचार आणि आदर्श सांगतानाच या कथांनी समाजातील अंतर्विरोधाचेही चित्रणं केले. सभोवतालच्या वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. समूहांना बरोबर घेऊन स्वाभिमानी वृत्तीने जगणाऱ्या माणसांची ही कथा आहे.

'भारतीय संविधानात' डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री-पुरूष हे समान असल्याचे लिहिले आणि स्त्री ही माणूस असल्याचे सिद्धकेले. त्यांनी हिंदू कोड बिल लिहून स्त्रीस्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. याचा परिणाम असा झाला की, स्वातंत्र्यामुळे स्त्री शिकू लागली. दुसरी घटना म्हणजे युनोनी १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष' म्हणून जाहीर केले. आंबेडकरी विचाराचा आदर्श घेऊन इथे स्त्रीवादी चळवळी उदयास आल्या. त्यामुळेच स्त्रिया फुले, आंबेडकरांच्या विचारांच्या स्त्रीजाणिवेच्या कथा लिहू लागल्या. सन १९७५ नंतर आशा बगे, मेघना पेठे यांनी स्त्रीवादी भूमिका कळत-नकळत घेतली. आशा बगेंची 'मैत्रीण' ही कथा नव्या जाणिवेची आहे. या कालखंडातील कथा स्त्रिची कणखर भूमिका आणि स्त्रीत्वाच्या चौकटी मोडणाऱ्या आहेत. या कथेची भाषा बदलली. स्त्रिया अधिकाधिक धीटपणे लिहू लागल्या. या काळात प्रिया तेंडुलकर, गौरी देशपांडे, विजया राजाध्यक्ष, मेघना पेठे या लेखिकांनी स्त्रीस्वातंत्र्याचा अर्थ गायब केला. तर आंबेडकरचळवळीतील प्रतिभा इंगोले यांनी आंबेडकरी कथेला पुढे नेले. गावकुसातील स्त्री ही भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्यच आहे, हे जर भान राहिले असते. तर काही 'लेखिकांच्या कथा' कुटुंबापुरत्या आणि विशिष्ट जातीपुरत्या मर्यादित राहिल्या नसत्या. स्त्रीवादी लेखिकांनी पुरूषी व्यवस्थेच्या पुढे जाऊन लिहिणे गरजेचे आहे.

सन १९७५ नंतर लिहिणाऱ्या प्रमुख कथाकारांत भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, दादा गोरे, नरेंद्र मारवाडे, गणेश आवटे, प्रभाकर हरकळ, राम कदम, शिवाजी मुंढे, शंकर परचुरे, या लेखकांनी खेड्यातील गावकुसात राहणाऱ्या अस्पृश्यांचे जीवन चित्रित केले. त्यांच्या जीवनातले ताण-तणाव चित्रित केले. ग्रामीण भागातील माणसाला जात कशी आवडते याविषयीचे चित्रण आले.

सन १९७८ ला मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा मुद्दा उपस्थित झाला. नामांतराची दंगल केवळ मराठवाड्यापुरती न राहता महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर पोहोचली ग्रामीण जीवन ढवळून काढणाऱ्या या घटनेने एकीकडे सर्वसामान्य खेड्यातला माणूस भयभीत झाला, तर शहरातल्या सुशिक्षित नवबौद्ध तरूणाने दलित पँथरच्या माध्यमातून मुठी आवळल्या . याचा परिणाम असा झाला की, कथाकार जातीयतेचे भयाण रूप चित्रित करतातना आंबेडकरी चळवळीवर खरमरीत टीका करू लागला. नामांतराच्या चळवळीनंतर देशात अशांतता निर्माण करणाऱ्या दंगली, जळित प्रकरण, शेतकऱ्यांची चळवळ, फोफावू लागली. बहुजन समाजातील लेखक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, उत्तम इलेकर, यादव गायकवाड, प्रकाश

मोगले, अरूण सुखा पाटील, डॉ. प्र.भा.चौधरी, नारायण सिरसाळे, श्रीमती इंदिरा पाटील, पंढरीनाथ वेडू कोळी, इतबार जी. तडवी, सुलभा भानगावकर, सखा कलाल, सदानंद देशमुख, श्रीराम गुंदेकर, कृष्णा इंगोले, वसंत केशव, भीमराव वाघचौरे, भास्कर बडे, मुकुंद गायकवाड, चारूता सागर, अनुराधा गुरव या सर्व कथाकारांनी भारतीय स्वातंत्र्यानंतर येथील सामान्य माणसांची झालेली फसवणूक, दैन्य, दारिद्र्य, अवहेलना,उपेक्षा, बलात्कार, दुष्काळ, दंगली, कर्जबाजारीपण आणि अंधश्रध्दा या अनुषंगाने कथालेखन केले. तसेच ग्रामीण भागातील गावकुसातील आणि गावकुसांबाहेरील अस्पृश्यांची झालेली कुत्तरओढ, फट-फजिती चित्रित केली. नव्या युगात आत्महत्यांनी नवीनच प्रश्न निर्माण केले आहेत.

सन १९९० नंतर ते पुढे कथालेखन करणाऱ्या कथाकारात आणि आत्मटीका करणाऱ्या आंबेडकरी चळवळीच्या कथाकारांत के.व्ही.सरवदे, प्रा.आत्माराम गोडबोले, विलास सिंदगीकर, गोरख भालेराव, तु.लि.कांबळे, वा.मा.वाघमारे, बी. व्ही. कांबळे, जयराज खुने, प्र.रा.बोरकर, सीताराम धसवाडीकर, विशाल वाघमारे, किशोर घोरपडे, या कथाकारांचा समावेश होतो. बौद्ध धम्मस्वीकारानंतर या धम्मातला किडलेल्या मनाचा उपासक होताना, आर.पी.आयच्या विघटनानंतर किडलेला मनाचा नेता आंबेडकरी तत्त्वज्ञान माहित असूनही जुना धर्म न सोडणारा किडलेल्या मनाचा माणूस या कथांमधून सतत अंगावर धाऊन येतो आहे. सन १९९० नंतरची मराठी कथा व्यक्ती कडून समष्टीकडे जाणारी आहे. व्यक्तीच्या व्यथा वेदना, इच्छा आणि तृष्णा यापेक्षा समाजजीवनाशी निगडित झालेली कथा ही जगातील सर्व दुःखितांची कथा होऊन जाते. ही कथा हरवलेल्या जीवनाचा शोध घेणारी आहे. ती मानसिक व शारीरिक दास्यांचे, दुःखाचे चित्र रेखाटते. ते भारतीय समाज व्यवस्थेच्या तळाशी खदखदणाऱ्या सांस्कृतिक ज्वालामुखीचे रुप घेऊन पारंपरिकतेला दिलेला नकार आणि नव्या विचारांचा स्वीकार यातील द्वंद्व चित्रित करीत आहे. जीवनातले ताण-तणाव, सामाजिक व सांस्कृतिक दंभाचा स्फोट आणि अफाट दुःखाच्या कारणांचा शोध घेत आहे. ही कथा जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रातली विषमता उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करते.

आंबेडकरवादाने जगातील सर्व माणसांना आपल्याकडे आकर्षित केले आहे. आंबेडकरी विचारांची कथा नव्या समाजरचनेचे स्वप्न पाहत आहे. सारा भारत प्रबुद्ध करण्याचे तिचे स्वप्न आहे. तेच उद्दिष्ट आहे. म्हणून हा कथालेखक केवळ ऐक्याचा आभास निर्माण करीत नाही, तर तो या संपूर्ण अस्पृश्यांना, आदिवासी, भटक्या विमुक्तांना गुलामीची जाणीव करुन देऊन नव्या विचारांची बद्धांच्या विचारांची वाट दाखवणारा आहे.

नवे कथाकार थांबत आहेत. त्यांना आत्मकथांचा मोह होत आहे. दुसरे असे की, कथा हा वाङ्मयप्रकार थोडा रंजन करणारा आहे आणि आंबेडकरवाद हा गंभीर प्रकृतीचा आहे. त्यामुळे आंबेडकरी साहित्यात कथेपेक्षा वैचारिक साहित्य अधिक जोर धरत आहे.

नव्या मराठी आंबेडकरी कथेवर वर्ण-व्यवस्था संपवायची जबाबदारी तर आहेचपण; समाजातला भ्रष्टाचार, स्वैराचार, हिंसाचार, खोटारडेपणा थांबवायचा आहे. हे मुद्दे घेऊन येणाऱ्या कथेचा भविष्यकाळ अभ्युदयाचा, विकासाचा आहे हे निश्चित.!

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani